# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### वित्त व लेखा विभाग
## परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलंग्न महाविद्यालये,
मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-०७.

**विषयः- परीक्षा आयोजनासाठी दिलेल्या उचल रकमांचे वेळेत समायोजन होण्याबाबतची उपाययोजना.**

आपणांस विदित आहेच की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परीक्षा आयोजनासाठी देण्यात येणा-या अग्रीम रकमांचे समायोजन वेळेत होण्याच्या दृष्टीकोनातून विविध उपाययोजना राबवीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार महाविद्यालयांना अग्रीम रकमांचे हिशेब सादर करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या कालमर्यादेत हिशेब सादर न करणा-या महाविद्यालयांस दंड आकारण्यात येत आहे. या निर्णयानुसार प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये काही अडचणी येत असल्यामुळे विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार यामध्ये बदल करून खालीलप्रमाणे सुधारित उपाययोजना अंमलात आणण्यात येत आहेत.

**महाविद्यालयांनी परिक्षेचे हिशेब सादर करण्याची विहित कालमर्यादा न पाळल्यास दंड आकारण्यात येणार आहे.**

**१. परीक्षा संपल्यापासून ६ महिन्यापर्यंत- निरंक**
**२. परीक्षा संपल्यापासून ६ महिने ते १२ महिने कालावधीपर्यंत- एकूण मंजूर खर्चाच्या १० टक्के.**
**३. परीक्षा संपल्यापासून १२ महिने ते १८ महिने कालावधीपर्यंत- एकूण मंजूर खर्चाच्या २० टक्के.**
**४. परीक्षा संपल्यानंतर १८ महिने कालावधीनंतर सादर करण्यात आलेल्या हिशेबाची कार्यवाही खालीलप्रमाणे.**

**१) परीक्षा संपल्यानंतर महाविद्यालयाने १८ महिन्यानंतर परीक्षेचे हिशेब सादर केले असल्यासः-**

**अ. अग्रीम रक्कम दिलेली असेल तरः-**

१. एकूण मंजूर खर्चाच्या ४०% रक्कम दंड आकारणी करण्यात येईल.
२. मंजूर खर्चाच्या ६०% रकमेतून सर्व अग्रीम रकमांची वसूली करण्यात येऊन उर्वरीत रक्कम महाविद्यालयाला अदा करण्यात येईल.
३. मंजूर खर्चाच्या रकमेतून उचल रकमेची वसूली झाली नाही तर, महाविद्यालयाकडून उचल रकमेचे समायोजन होण्यासाठी आवश्यक रक्कम घेण्यात येईल.
४. उपरोक्त ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाविद्यालयाने उर्वरीत रक्कम विद्यापीठास दिली नाही तर, संबंधित महाविद्यालयास पुढील परीक्षेसाठी अग्रीम रक्कम देण्यात येणार नाही.
५. महाविद्यालयाकडून नंतरच्या काळात प्राप्त होणा-या परीक्षेच्या हिशेबातून प्रथम जून्या सर्व अग्रीम रकमांची वसूली करण्यात येईल.

**ब. अग्रीम रक्कम दिलेली नसेल तरः-**

१. मंजूर खर्चाच्या ४०% रक्कम दंड आकारणी करण्यात येईल.
२. मंजूर खर्चाच्या ६०% रकमेतून जुन्या अग्रीम रकमांची वसूली करण्यात येईल व उर्वरीत रक्कम महाविद्यालयास अदा करण्यात येईल.

**२)** अग्रीम रक्कम प्रलंबित असलेल्या महाविद्यालयास नव्याने परीक्षेसाठी अग्रीम रक्कम देण्यात येणार नाही.

**३)** महाविद्यालयाची विद्यार्थीसंख्या कमी असल्याने, तसेच पूर्वीच्या अग्रीम रकमा प्रलंबित असल्याने पुढील परीक्षांसाठी अग्रीम रक्कम दिली गेली नसल्यास अशा प्रकरणामध्ये देखील महाविद्यालयांनी परीक्षा संपल्यानंतर ६ महिन्यांच्या आत हिशेब सादर करणे आवश्यक राहील.

**सदर परीपत्रकातील नियमांची अंमलबजावणी परीपत्रकाच्या दिनांकापासून व ऑक्टो/नोव्हें-२०१७ च्या परीक्षेपासून लागू राहील.**

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
**जा.क्र. :** परीक्षा वित्त/२०१७-१८/३२९
**दिनांक :** १६/०१/२०१८

सीए. (डॉ.) विद्या गारगोटे
**वित्त व लेखा अधिकारी**
अतिरिक्त कार्यभार